गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/454 /२०१६ दि. २०/०२/२०१६

# अधिसुचना

## (अत्यंत तातडीचे)

प्रती,

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत

सर्व महाविद्यालये/प्राचार्य,

विषयः— सन २०१५—१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क व शिक्षण शुल्काबाबत.

संदर्भः— १) शासन पुरकपत्र क्रमांकःशुल्क—५२१५/प्र.क्र.३७४/१५/मशि—२,दि.०७ डिसेंबर २०१५.

२) शिक्षण संचालनालय पुणे क्रं. उशिस/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५—१६/१२७७५, दिनांक ०८/१२/२०१५.

३) शा. नि. महसूल व वन विभाग क्र. एससीवाय—२०१५/प्र.क्र.३११/म—७, दिनांक २०/१०/२०१५.

४) जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय क्रं.कार्या—३/अकासअभुअ/कवि/६२८/१५, दि. २९ ऑक्टो.२०१५

५) पत्र क्रं.जमिन/का—४/स.अ.भू.अ./सी.आर.७१/कवि—१९३०/१५, दि. ३१/१२/२०१५

६) विद्यापीठाचे परीपत्रक क्रं./गो.वि/परीक्षा विभाग/३६३४/२०१५, दि. २३/१२/२०१५.

७) विद्यापीठाचे परीपत्रक क्रं./गो.वि/परीक्षा विभाग/३३४/२०१५, दि. १०/०२/२०१६.

उपरोंक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता सत्र २०१५—२०१६ करीता तालूकानिहाय ज्या गावातील खरीप हंगामातील पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे अशा गावातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क शासन स्तरावर माफ करण्याची कार्यवाही घेण्यात येत असून **संदर्भ क्रं. ३,४ व ५ नुसार पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयातील प्रभावित गावाची यादी मा. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर व मा. जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे उपलब्ध आहेत . संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यानी सदर यादी नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहीती तसेच शासनास संदर्भ क्रं. २ नुसार विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करावयाचे असल्यास किती आर्थीक भार येईल याची माहीती शासनाला कळविणे आवश्यक असल्यामुळे संदर्भीय प्रपत्रात सादर करावे. तसेच परीक्षा शुल्क माफ करण्याकरीता संदर्भ क्रं. १ नूसार संलग्नीत केलेल्या प्रपत्र व प्रमाणपत्रात संबंधित माहीती भरून व ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावातील विद्यार्थी असल्याची खात्री करून विद्यापीठात दि.२३/०२/२०१५ पर्यंत विद्यापीठात पाठवावी.** सदर बाबतीत शासन निर्णयानुसार तात्काळ कार्यवाही घ्यावी.

संबंधीत महाविद्यालयानी याची प्राध्यान्याने नोंद घ्यावी.

उपकुलसचिव,
(परीक्षा पुर्व विभाग)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सोबत :— संदर्भिय शासन निर्णय, प्रमाणपत्र व प्रपत्र (अवलोकनार्थ)

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, यादीत दर्शविलेले परिक्षार्थी या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी असुन ते गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाच्या उन्हाळी २०१६ च्या परिक्षेला बसलेले आहेत. ते ई.बी.सी. धारक असुन टंचाईग्रस्त गावातील रहिवासी आहेत. म्हणुन ते परीक्षा फीची प्रतिपुर्ती करण्यास पात्र आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालकांनी अशा विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर जे विद्यार्थी सवलतीस पात्र ठरत असतील त्यांच्या परीक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट तयार करून ते गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली कडे "प्रतिपूर्तीची रक्कम" म्हणुन पाठवावेत.

**प्राचार्यांची सही व शिक्का**

# प्रपत्र

(परीक्षा शुल्का करीता)

**महाविद्यालयाचे नावः—............................................**

**सत्र २०१५—१६**

| अ. क्रं. | विद्यार्थ्यांचे नाव | अभ्यासक्रम | सेमीस्टर | ५० पैशापेक्षा कमी आणेवारी असलेले गाव | परीक्षा फी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | एकुण | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त प्रपत्रात नोंदविलेली माहीती संबंधीत विद्यार्थ्यांच्या दस्ताऐवजावरून घेतलेली असुन सदर माहीती बरोबर आहेत.

**प्राचार्यांची सही व शिक्का**